पुढारी

मंगळवार, १ एप्रिल २०२५

## दत्ता जाधव यांना पीएच. डी. प्रदान



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने राज्यशास्त्र विषयाची पीएच.डी. दत्ता जाधव यांना प्रदान केली. 'भारतातील विसाव्या शतकातील लोकशाही विचार आणि भारतीय राज्यघटना' या विषयाचे त्यांनी संशोधन केले. जाधववाडी (ता.पन्हाळा) येथील जाधव यांनी शाहू मिल कामगाराच्या कुटुंबातून येत उच्चशिक्षण पूर्ण केले. ते सध्या विवेकानंद कॉलेज येथे ते अध्यापन करत आहेत. संशोधनासाठी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, डॉ. रवींद्र भणगे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, डॉ. श्रुती जोशी यांनी मार्गदर्शन केले.

तरुण भारत संवाद

बुधवार, ९ एप्रिल २०२५

# विवेकानंदच्या 'प्लेसमेंट'मधून ८६ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील विज्ञान शाखेतील अंतिम वर्षात शिकत असलेल्या एकूण ८६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल मार्फत 'प्लेसमेंट ड्राईव्ह' चे आयोजन करण्यात आले होते. प्लेसमेंट ड्राईव्हसाठी विविध ७ नामांकित कंपन्याकडून १२६ विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी व तोंडी मुलाखत घेण्यात आली. त्यातून ८६ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष १.८ ते २. ४ लाखांचे पॅकिज देण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. विद्यार्थ्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग, प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लट्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. विजय पुजारी, डॉ. उपाध्ये, डॉ. कासारकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

9/04/25

22.4.25

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ■ मराठी दैनिक रविवार भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

# ग्लोबल टाइम्स

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621

▸ वर्ष - १३ ▸ अंक - ९१ ▸ रविवार दि. १३ एप्रिल २०२५ ▸ मुंबई ▸ पाने - ०८ ▸ किंमत - ₹३

# विवेकानंद कॉलेजच्या प्लेसमेंट ड्राईव्हमधून ८६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमधील विज्ञान शाखेतील अंतिम वर्षात शिकत असलेल्या एकूण ८६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलमार्फत 'प्लेसमेंट ड्राईव्ह'चे सोमवारी (दि.७) आयोजित करण्यात आले होते.

या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी अँकेनॉल इंडिया, एमकूर फार्मा, एंझीन बायो - सायन्स, निप्रो इंडिया, सँडविक कोरोमंट, गेलटेक, ऐडविक या कंपन्या सहभागी झाल्या होत्या.



या कंपन्यांकडून एकूण १२६ विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी व तोंडी मुलाखत घेण्यात आली. त्यातून ८६ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष १.८ ते २.४ लाखांचे पॅकेज देण्यात आले. निवड झालेले हे सर्व विद्यार्थी अल्पावधीतच वेगवेगळ्या पदावर रुजू होतील. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

या विद्यार्थ्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षाच्या डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग, प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लट्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. विजय पुजारी, डॉ. उपाध्ये, डॉ. कासारकर, प्रा. वृषाली मिसाळ, प्रा. राहुल इंगवले यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
१६ एप्रिल २०२५

# 'विवेकानंद'चा 'एनआयआयटी' सोबत करार

## रोजगारासह मनुष्यबळाला मिळणार चालना :तरुणांना कौशल्यनिर्मितीची संधी उपलब्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

कौशल्य विकास, संशोधन क्षेत्राला चालना आणि रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नवी दिल्ली येथील एनआयआयटी फाउंडेशनबरोबर सामंजस्य करार केला आहे. आयबीएम स्किल्स-बिल्ड प्लॅटफॉर्मद्वारे तरुणांना कौशल्य-निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देणे, कौशल्य विकासासाठी नवीन अभ्यासक्रमांच्या निर्मितीची निरंतर प्रक्रिया राबवणे ही सामंजस्य कराराची वैशिष्ट्ये आहेत.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे आणि एनआयआयटी फाउंडेशनतर्फे दिपककुमार त्रिवेदी यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. कराराच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रामध्ये आवश्यक असणारी विविध तांत्रिक कौशल्ये तसेच सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, डेटा अॅनॅलिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा विविध तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल.




**कोल्हापूर : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नवी दिल्ली येथील एनआयआयटी फाउंडेशनबरोबर सामंजस्य कराराचे पत्र एकमेकांना देताना संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे व फाउंडेशनचे दिपककुमार त्रिवेदी.**

त्यामुळे विविध कौशल्यांनी युक्त युवक वर्गाची निर्मिती झाल्याने स्पर्धात्मक क्षमता उच्च दर्जाची होईल आणि बेरोजगारी कमी करण्यास सहाय्य होईल.

याप्रसंगी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ,धाराशिव; पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव; दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज ,इचलकरंजी; राजे रामराव महाविद्यालय, जत; डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, मिरज; सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंग, कोल्हापूर; दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी ; डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कोल्हापूर यांनी महाविद्यालयीन स्तरावरील सामंजस्य करार केले. प्रास्ताविक संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्रा. विरेन भिर्डी यांनी केले. त्रिवेदी यांनी कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा सादर केला.

प्राचार्या शुभांगी गावडे म्हणाल्या, कौशल्यपूर्ण युवकच आत्मविश्वासपूर्ण असतो. ज्ञान आणि कौशल्यनिर्मिती ही निरंतर प्रक्रिया असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांनी नेहमी जागरूक असावे. या कराराच्या माध्यमातून सक्षम युवक निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. संस्थेच्या अर्थ विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. एम. एस. हूजरे यांनी शालेय जीवनापासूनच कौशल्य विकास महत्वाचा असल्याचे सांगितले.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे या करारासाठी मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. जे. एस. देशमुख, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, प्राचार्य डॉ. एस. एस. मणेर, आर. के. भडके, डॉ. के. ए. कांबळे, डॉ. सी. एस. बागडी, आदी उपस्थित होते. प्रा. सुदर्शन महाडिक यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक प्रा. विराज जाधव यांनी नियोजन केले.

तरुण भारत संवाद बुधवार, २३ एप्रिल २०२५

# 'वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी सहभागी व्हावे'

**कोल्हापूर :** हवामान बदल, प्रदूषण, लोकसंख्या वाढ वृक्षतोड इत्यादीमुळे आज पृथ्वीवरील अवघ्या मानव जातीसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. मोठ्या प्रमाणात जैवविविधता ऱ्हास होत आहे. यासाठी युवकांनी या सुंदर अशा वसुंधरेच्या शाश्वत भविष्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात छोट्या छोट्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गोवर्धन उबाळे यांनी केले.



वसुंधरा दिनानिमित्त विवेकानंद महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'पर्यावरण संवर्धनामध्ये युवकांची भूमिका' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी प्रा. शिल्पा भोसले होत्या. डॉ. उबाळे म्हणाले, वृक्षारोपण, ऊर्जेची बचत, पाण्याचा जपून वापर करावा. 'वसुंधरा माझी माता' या कवितेचे वाचनही त्यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा ए. आर. धस यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. पी. वेदांते व प्रा. ए. बी. गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. डी. आर. पाटील, प्रा. एस. एस. देशपांडे, प्रा. एस. ए. रोटे, प्रा. पी. वाय. राठोड, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. बी. एस. कोळी, आदी उपस्थित होते.

23/4/2025

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २३ एप्रिल २०२५

# वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी योगदान द्यावे : डॉ. उबाळे

कोल्हापूर : हवामान बदल, प्रदूषण, लोकसंख्यावाढ, वृक्षतोडीमुळे पृथ्वीवरील मानव जातीसमोर मोठे संकट आहे. मोठ्या प्रमाणात जैवविविधता ऱ्हास होत आहे. यासाठी युवकानी वसुंधरेच्या शाश्वत भविष्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन भूगोल विभागप्रमुख डॉ. गोवर्धन उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयामध्ये वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण संवर्धनामध्ये युवकांची भूमिका' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. शिल्पा भोसले होत्या. यावेळी पर्यावरण विभागाकडून देशी वृक्ष बिया संकलन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रा. ए.आर. धस यांनी आभार मानले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. ए. बी.गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. डी. आर. पाटील, प्रा. एम. एस. देशपांडे उपस्थित होते.

23/4/2025

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. २४ मार्च २०२५

# परिस्थितीशी लढला; एसआरपीएफ पोलीस बनला

## बावड्यातील समीर शेखचे यश : सेंट्रिंग कामगार पित्याचे पांग फेडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापुर :** वडील सेंट्रिंग कामगार, तर आई गृहिणी...वडिलांच्या मजुरीवरच घराची गुजराण. अशी ओढाताण किती दिवस करायची ही खंत त्याला मनाशी नेहमी बोचायची. ही परिस्थती बदलायची असेल तर आपणालाच धावावे लागेल ही खूणगाठ मनाशी बांधून तो भल्या पहाटे सहा-सात किलोमीटर धावायचा. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता अखंडपणे तो धावला अन् एसआरपीएफ पोलिस बनत तो जिंकलाही. कसबा बावडा येथील समीर बशीर शेख या तरुणाचा या यशामागचा संघर्ष अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.



बावड्यात राहणाऱ्या समीरने विवेकानंद कॉलेजमधून बी.कॉम.ची पदवी घेतली. मात्र, घरची परिस्थती नाजूक असल्याने तो येथील गॅस एजन्सीमध्ये काम करत होता. ही परिस्थिती बदलायची असेल तर शासकीय नोकरी मिळवावी लागेल ही खूणगाठ त्याने बांधली. सुरुवातीपासूनच राज्य राखीव पोलिस दलात (एसआरपीएफ) जाण्याचे ध्येय ठेवून त्याने तयारी सुरू केली. भल्या

**६ ते ७ कि.मी. भल्या पहाटे धावणे हा त्याचा दिनक्रम होता**

### एजन्सी मालकाचा चांगुलपणा

ज्या गॅस एजन्सीमध्ये समीर कामाला होता. तेथील गॅस एजन्सी मालक इंद्रजित कारंडे यांनी त्याला पोलिस भरतीची तयारी करण्यासाठी बळ दिले. त्याचा सुटीमधील पगारही कापला जात नव्हता. विशेष म्हणजे समीरची निवड झाल्यानंतर मालक कारंडे यांनीच सर्वांना जेवण देत याचा आनंद साजरा केला.

पहाटे तो बावडा ते गिरोली घाटापर्यंत रोज धावायचा. तेथून घरी आला की पुन्हा गॅस एजन्सीमध्ये कामाला जायचा. २०२४ मध्ये त्याने एसआरपीएफची परीक्षा दिली. लेखी आणि शारीरिक क्षमता चाचणीत तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. सध्या तो पुण्यात एसआरपीएफचे प्रशिक्षण घेत आहे.